BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांची स्टार हॉटेलमध्ये निवड



कॅम्पस मुलाखतीतून निवड झालेले विद्यार्थी.

**पाटण, दि. ७ :** कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये पुणे येथील विवांता बाय ताज, जे डब्लू मॉरियेट, रॅडिसन ब्लू , लेमन ट्री या स्टार हॉटेलच्या कॅम्पस मुलाखती पार पडल्या. या मुलाखतीतून इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या ३२ विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमधून १० वी व १२ वी तसेच पदवीनंतर डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाते. कोर्स पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व जॉब प्लेसमेंट कॉलेजमार्फतच दिले जाते. देशात व परदेशात प्रशिक्षण व जॉब प्लेसमेंट उपलब्ध करून देण्याची सुवर्णसंधी कॉलेजमार्फत करून देण्यात येते. कॉलेजमध्ये जिल्ह्यातील तसेच परजिल्ह्यातील विविध भागांमधून येऊन विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटची स्थापना २०२२ मध्ये झाली असून कॉलेजचे हे दुसरे वर्ष आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट हे जिल्ह्यातील प्रथम आयएसओ (९००१:२००५) मानांकित कॉलेज असून या कॉलेजमध्ये सुसज्ज क्लासरूम्स, डिजिटल मल्टिमीडिया रूम, ट्रेनिंग किचन, रेस्टॉरंट, बँक्वेट हॉल, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग रूम, ऑडिटोरिअम हॉल, लायब्ररी, कॉम्प्युटर लॅब, मुले व मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेल, उच्च अनुभवी शिक्षक, अशा सर्व सोई आहेत. अल्पावधीत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या पसंतीस उतरलेले हे एकमेव कॉलेज आहे. हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भरत कांबळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण आदींसह सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी कॉलेजशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य चेतन सावंत यांनी केले आहे.